# [प्रकरण ३]

उध्दवराव पाटील आणि

शेतकरी कामगार पक्ष

# प्रकरण ३ रे

## उध्दवराव पाटील आणि शेतकरी कामगार पक्ष


३.१ शेतकरी कामगार पक्षाचा उदय

३.२ शेतकरी कामगार पक्षाचे तत्वज्ञान
मुख्य संदर्भ दाभाडी प्रबंध

३.३ शेतकरी कामगार पक्षाच्या मराठवाड्यातील वाटचालीमध्ये उध्दवराव यांचा वाटा

३.४ उध्दवराव पाटील यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांची केलेली मिमांसा

३.५ उध्दवराव पाटील आणि उस्मानाबाद जिल्हा.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

# प्रकरण ३ रे

## ३.१ शेतकरी कामगार पक्षाचा उदय :

सत्यशोधक समाजाच्या चळवळीतून निर्माण झालेले नेतृत्व शेतकरी कामगार पक्षास लाभलेले होते. या पक्षाची निर्मिती ही मुळात ब्राम्हणोत्तर चळवळीतून झालेली आहे. ब्राम्हणोत्तर चळवळीचा रोख सुरूवातीला सावकारशाही व भिक्षूकशाही यांच्या विरूध्द होता. परंतु नंतर शिक्षणाने जागृत झालेल्या ब्राम्हणोत्तर तरूणांच्या मनात साम्राज्यशाही ही सावकारशाही व भिक्षूकशाही यांच्यापेक्षा अधिक भयंकर असून ती प्रथम नष्ट करणे आपले कर्तव्य आहे असा विचार निर्माण होवून तो वर्ग साम्राज्यशाहीविरूध्द लढयात सामील होण्यासाठी गांधीजींच्या नेतृत्वाच्या झेंडयाखाली येवू लागला.(१)

१९४२ च्या लढयाच्यावेळी महात्मा गांधींनी कॉंग्रेस ही शेतक-यांचे व कामगारांचे राज्य स्थापन करील असे जाहीर केले होते. परंतु कॉंग्रेसचे नेतृत्व शेटजी व भटजींच्या हाती गेल्यामुळे शेतकरी व कामगारांचे राज्य निर्माण होवू शकणार नाही असे वाटल्यावरून शेतकरी व कामगार यांच्या हिताचे विचार मांडणारा त्यांच्यासाठी कांही योजना सुचविणारा व त्या कार्यवाहीत आणण्यासाठी धडपड करणारा असा एक गट, पक्ष किंवा संघ अंतर्गत असावा असा विचार बहुजन समाजाच्या लोकांच्या मनात निर्माण झाल्यामुळे याच ठिकाणी शेतकरी कामगार पक्षाच्या जन्माची मुहूर्तमेढ रोवली गेली. (२)

कॉंग्रेस अंतर्गत राहून कॉंग्रेसचा राजकीय आर्थिक व सामाजिक कार्यक्रम बहुजन समाजासाठी अधिक प्रभावी करण्याच्यादृष्टीने व विशेषत: शेतकरी कामकरी राज्य स्थापन करण्याच्या कॉंग्रेसच्या घोषणेस मुर्त स्वरूप

देण्यासाठी, संघटीत शक्ती निर्माण करण्यासाठी कॉंग्रेस अंतर्गत शेतकरी संघ स्थापन करण्याचा प्रयत्न बहुजन समाजातील वर्गाने केला.(३) परंतु कॉंग्रेस अंतर्गत असा संघ स्थापनेस कॉंग्रेस पक्षाच्या नेतृत्वाने मान्यता न दिल्याने बहुजन समाजातील गट कॉंग्रेसमधून बाहेर पडला व त्यांनी शेतकरी कामगार पक्षाची स्थापना केली.

कॉंग्रेस पक्षातून फुटून निघालेल्या या गटाने शेतकरी कामगार पक्षाची स्थापना केल्यानंतर अल्पावधीतच हा पक्ष १९५२ च्या निवडणूकीत कॉंग्रेसला महाराष्ट्रात आव्हान ठरल्याचे निवडणूक निकाला-वरुन दिसते. मुंबई राज्य विधानसभेत पक्षाला चांगले यश मिळाले. मराठवाडयातून हैद्राबाद विधानसभेसाठी या पक्षाचे दहा आमदार निवडून आले. कॉंग्रेसला विरोध करणारा तोच प्रबळ विरोधी पक्ष ठरला.(४)

शेतकरी कामगार पक्षाच्या मंडळींनी शरदचंद्र बोस यांच्याशी वाटाघाटी करुन निखळ डाव्या विचारांचा कॉंग्रेसला पर्यायी पक्ष उभा करण्यासाठी प्रयत्न केला. परंतु शरदचंद्र बोस यांचे अकाली लवकर निधन झाल्यामुळे त्यांचा फॉरवर्ड ब्लॉक फुटला त्यामुळे सहाजिकच पुढच्या राजकारणाने गती घेतली नाही. अखिल भारतीय पक्षाचा विचार करणाऱ्या नेत्यांना एका प्रादेशिक पक्षाचे नेतृत्व करावे लागले. शेतकरी कामगार पक्ष हा प्रादेशिक पक्ष म्हणूनच आपले अस्तित्व टिकवू शकला.(५)

शेतकरी कामगार पक्ष हा महाराष्ट्राच्या १५ जिल्हयात पाय रोवून आहे.(६) संपूर्ण महाराष्ट्रात या पक्षाला आपली ताकद उभी करता आली नाही हे सत्य न नाकारता येण्यासारखे आहे. शेतकरी कामगार पक्षात अगदी सुरुवातीपासूनच राजकीय मतभेदापेक्षा व्यक्तीगत हेवेदावे पुढा-यामध्ये होते. व्यक्तीगत भांडणामुळे पक्ष बरबाद होईल व लयालाही जाईल या गोष्टीचा कोणीच विचार केलेला नाही.(७)

भारताच्या स्वातंत्र्याच्या राजकारणाच्या उदरातून अनेक पक्ष निर्माण झाले. परंतु या पक्षाला इतिहासातील सामाजिक व आर्थिक संघर्षाची पार्श्वभूमी लाभली होती. नवीन पक्षाच्या नेत्यांनी त्या त्या आशयाची बैठक बिनचूक साधली.(८) शेतकरी कामगार पक्षातील नेते मंडळी दोन सार्वत्रिक निवडणूकांच्यामधून मोठ्या प्रमाणात काँग्रेसमध्ये गेली. पक्षाचे अस्तित्व टिकविण्याची जबाबदारी तिस-या व चौथ्या श्रेणीच्या नेतृत्वाकडे आली. राज्याच्या एखाद्या कोप-यात कोठे कोठे पक्ष टिकून राहिला.(९)

शेतक-यांची व शेतमजूराची संघटना बांधण्यामध्ये या पक्षाला आलेले अपयश हे देखील पक्षाची वाढ न होण्यास कारणीभूत ठरले. आपल्या हितसंबंधाला बाधा येताच पक्षातील बरीच मंडळी पक्ष सोडून दुस-या पक्षात गेली. पक्ष जर मजबूत करावयाचा असेल तर त्यासाठी पक्षाची संघटना मजबूत असावयास पाहिजे. काँग्रेस पक्ष सोडल्यास देशातील विरोधी पक्षात संघटनेचा अभाव दिसून येतो. त्याला शेतकरी कामगार पक्ष अपवाद नाही. अलिकडे काँग्रेस पक्षातसुध्दा संघटनेच्या बाबतीत विस्कळीतपणा आलेला आहे. काँग्रेस पक्षाखालोखाल या पक्षाची संघटना देशात आहे ती इतर कुठल्याही पक्षाची काँग्रेस पक्षासारखी नाही. शेतकरी कामगार पक्षाने आपली संघटना गाव पातळीवर उभी केलेली आहे व याच शाखेला नवीन सभासद करण्याचे सर्व अधिकार दिले आहेत.(१०)

ज्या शेतकरी कामगार पक्षाने शेतकरी व कामगारांचे राज्य स्थापन करावयाचे ठरविले होते तो पक्ष आपल्या पाठीमागे शेतकरी व कामगाराचे पुरेसे पाठबळ उभे करू शकला नाही. त्याकडे

पक्षातील नेत्यानी दुर्लक्ष केले. प्रा. एन. डी. पाटील यानीही आघाडीच्या राजकारणाने याकडे दुर्लक्ष झाल्याचे मान्य केले.(११)

महाराष्ट्रातील सत्ताधारी पक्षाला विरोध करणारा प्रबळ विरोधी पक्ष म्हणून शेतकरी कामगार पक्षाचे महत्व नाकारता येणार नाही. पक्षाची पडझड होत असताना, पक्षातून अनेक नेते मंडळी सत्ताधारी पक्षात जात असताना शेतकरी कामगार पक्ष आपले अस्तित्व टिकवून धरण्यात यशस्वी ठरला. अनेक संकटातून पक्षाने आपले अस्तित्व आजअखेर शाबूत ठेवलेले आहे. मार्क्सवादावर अढळ श्रध्दा असणारा पक्ष म्हणून त्याला महत्व आहे. मार्क्सवाद हा भारताच्या परिस्थितीला अनुसरुन रूजविण्याचा प्रयत्न या पक्षाने केलेला आहे. शेतकरी कामगार पक्ष निवडणूकीत जरी भरपूर जागा मिळवू शकला नसला तरी काँग्रेस विरोधी चळवळी करण्यात स्वत:चे स्थान टिकवून आहे. प्रा. एन. डी. पाटील यांनी म्हटले आहे, " आमची ताकद नसती तर चळवळीत आमचे स्थान राहिले नसते." (१२)

शेतकरी कामगार पक्षाला स्वत:चे केडर निर्माण करता आले नाही. पक्ष मजबूत करण्यासाठी व पक्ष वाढविण्यासाठी जे फॉलोअर्स (अनुयायी) पाहिजे असतात ते पुरेशा प्रमाणात पक्षाला निर्माण करता आले नाहीत. शेतकरी कामगार पक्षाची गरज महाराष्ट्राला एका विशिष्ठ काळात होती. ती गरज या पक्षाने पूर्ण केला आहे हे मला कबूल करण्यास कोणत्याही प्रकारची दिक्कत वाटत नाही असे यशवंतराव चव्हाणानी म्हटले आहे.(१३)

What is the context?

### ३.२ शेतकरी कामगार पक्षाचे तत्वज्ञान : मुख्य संदर्भ दाभाडी प्रबंध :

१९४२ च्या चलेजाव चळवळीच्या घोषणेच्यावेळी शेतकरी व कामकरी यांचे राज्य स्थापन करण्याच्या काँग्रेसच्या ठरावातील असंदिग्ध घोषणा झाल्यापासून बहुजन समाजातील हजारो तरूण काँग्रेसच्या क्रांती युध्दात सामील झाले.(१४) ११ सप्टेंबर १९४६ साली काँग्रेस अंतर्गत शेतकरी संघ स्थापन करण्याचा ठराव मंजूर झाला.(१५) २० जुलै १९४७ रोजी भाऊसाहेब राऊत व शंकरराव मोरे यांनी २ व ३ ऑगष्टला आळंदी येथे भरणाऱ्या सभेचे निमंत्रण पाठविले.(१६) आळंदी येथे होणाऱ्या बैठकीत खालील प्रश्नांचे बाबतीत चर्चा होईल.

झालेल्या व होवू घातलेल्या राजकीय फेरबदलाचे महत्व मापन. बहुजन समाजाविषयी कळवळ बाळगणाऱ्या समाजवादी विचार- सरणीच्या लोकांच्या शेतकरी राज्य स्थापन करण्याचे बाबतीतील आकांक्षा काँग्रेसच्या नेत्याकडून पूर्ण होतील कां ? त्या पूर्ण होण्याची आशा नसल्यास बहुजन समाजवादी कार्यकर्त्यांनी काँग्रेसचे बाबतीत कोणते धोरण स्विकारावे ? काँग्रेसमधील इतर डाव्या गटाचे धोरण कोणते आहे व त्यांच्या धोरणाशी आपणास कितपत सहमत होता येईल ? काँग्रेस बाहेरील समाजवादी भूमिका पत्करणाऱ्या पक्षाशी आपले संबंध कोणते असावेत ? देशातील डाव्या गटांचे एकजूटीचे प्रयत्न करणे इष्ट आहे काय ? व तसे करणे इष्ट असल्यास आपण कोणते प्रयत्न करावेत ? बहुजन समाजवादी कार्यकर्त्यांचा संघटीत पक्ष तयार करण्याची इष्टानिष्ठता. शेतकरी कामकरी वर्गात वर्गनिष्ठ भूमिकेवरून संघटीत काम करण्याची प्रत्यक्ष योजना. याच विषयाचे अनुषंगाने उत्पन्न होणारे इतर प्रश्न.(१७)

वरील विषयावरून काँग्रेस पक्ष सोडून जाण्याचे सुतोवाच

केले जाणार होते हेही स्पष्ट होते. आळंदी येथील बैठकीस २३ जण हजर होते. कॉंग्रेस शेतकरी कामकरी संघाच्या घटनेस १२-९-४७ च्या सभेत मान्यता देण्यांत आली.(१८)

२४ व २५ एप्रिल १९४८ ला मुंबईत अखिल भारतीय कॉंग्रेस समितीची बैठक होवून त्यात कॉंग्रेसमध्ये स्वतंत्र घटना व कार्यक्रम असलेले उपपक्ष किंवा गट असू नयेत अशा अर्थाची घटना दुरुस्ती मंजूर करण्यांत आली.(१९)

शेतकरी कामकरी संघाच्या नेत्यांची बैठक २९ एप्रिलला होवून जेधे, मोरे, राऊत, नलावडे, भापकर, तुळशीदास जाधव वगैरेनी ३१ मे पर्यंन्त कॉंग्रेस सदस्यत्वाचे राजीनामे द्यावेत असे ठरले.(२०) १३ जून १९४९ रोजी जेधे, मोरे वगैरेनी शेतकरी कामगार पक्षाची स्थापना केली.

शेतकरी कामगार पक्षाची स्वतंत्रपणे स्थापना केल्यानंतर या पक्षाचे दुसरे अधिवेशन मे १९५० मध्ये दाभाडी येथे भरले. या अधिवेशनात दाभाडी प्रबंध मांडण्यात आला. हा प्रबंध स्विकारल्यामुळे शेतकरी कामगार पक्षाने वेगळे वळण घेतले.(२१) हा प्रबंध म्हणजेच शेतकरी कामगार पक्षाच्या तत्वज्ञानाचा लिखित कागदोपत्री पुरावा होय. या प्रबंधात आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय परिस्थिती, हिंदी कम्युनिस्ट पक्षाच्या चूका, शेतकरी कामगार पक्षाचा जन्म व कार्य समाजवादी पक्षाचे स्वरूप व पक्षाचे पुढील कार्य याविषयी सविस्तर ऊहापोह केला आहे. शेतकरी कामगार पक्षाचे राजकीय तत्वज्ञान ~~समज~~ समजण्यासाठी दाभाडी प्रबंधात समाविष्ट केलेल्या गोष्टीचा विचार करणे गरजेचे आहे.

दाभाडी प्रबंध हा सहा प्रकरणात विभागलेला आहे. पहिल्या प्रकरणात आंतरराष्ट्रीय परिस्थितीचे वर्णन केलेले आहे. दुस-या महायुध्दानंतर आंतरराष्ट्रीय परिस्थितीत मूलभूत बदल झालेला आहे. दोन गट हे आंतरराष्ट्रीय राजकारणात निर्माण झाले. त्यापैकी एक भांडवलशाहीचा समर्थक तर दुसरा भांडवलशाही विरूध्दचा गट. पहिल्या गटाचे नेतृत्व अमेरिकेकडे होते तर दुस-या गटाचे नेतृत्व रशियाकडे होते.(२२)

भांडवलशाही अर्थव्यवस्था ही कामगार वर्गाने चालविलेल्या लोकशाही चळवळीमुळे खिळखिळी होत होती. साम्राज्यवाद्याविरूध्द त्या त्या देशातील व वसाहतीतील कामगार वर्ग संघर्ष करीत होता. स्वातंत्र्य चळवळ ही संपूर्ण जगाला व भारतातील लोकशाही संघर्षाला उपयुक्त ठरत होती. १९२८ साली मुंबईत लोकांनी कामगार वर्गाच्या नेतृत्वाखाली सायमन कमिशनबद्दल सरकारविरूध्द तीव्र निदर्शने केली.(२३)

पहिल्या महायुध्दानंतर साम्राज्यवाद्याविरूध्द बंड करण्याची लाट वसाहती देशामध्ये सुरु झाली. भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे असे मत होते की, ती लाट भारतात त्या काळात दिसून आली. भारतातील शेतकरी कामगार आणि मध्यम वर्गीयानी ब्रिटीश राजवटीविरूध्द आवाज उठविला. या लढ्याचे नेतृत्व मात्र भांडवलवाद्यांच्या हातात होते. त्यावेळी कामगारांचा राजकीय पक्ष अस्तित्वात नव्हता.(२४)

पहिल्या महायुध्दानंतर मात्र भारतात निर्माण झालेल्या उद्योगधंद्यामुळे कामगाराच्या संख्येत झपाट्याने वाढ झाली. एवढेच नव्हे तर भांडवल गुंतवणूकही निरनिराळ्या उद्योगधंद्यामध्ये मोठ्या प्रमाणात झाली. त्यामुळे भारतात कामगार वर्ग हा प्रमुख वर्ग बनला. भांडवलदाराच्या पिळवणूक प्रवृत्तीमुळे कामगार एकतर बेकार झाला किंवा एक तर त्याला कमी

रोजगार मिळू लागला.(२५)

१९२९ मध्ये भारताला कांही आर्थिक संकटांना तोंड द्यावे लागले. त्यावेळेस जागतिक मंदीचा काळ होता. त्यामुळे कामगार वर्गाला हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या. त्याचा परिणाम म्हणून कामगारवर्गात जागृती झाली. या जागृतीमुळे कम्युनिस्ट पक्ष अस्तित्वात आला. त्याचवेळी शेतकरी वर्गाचा संघर्ष वाढला. त्यामुळे त्याचे परिणाम राजकीय चळवळीवर झालेले पहावयास मिळतात. १९२८ साली सायमन कमिशनवर कामगार वर्गानी बहिष्कार टाकला.व सरकार विरुध्द तीव्र निदर्शने केली.(२६) दरम्यान ब्रिटीशानी कॉंग्रेसशी मिळते जुळते घेवून गांधी आर्विन करार घडवून आणला.

why repetition?

१९३७ मध्ये प्रांतिक सरकारच्या निवडणूका होवून कॉंग्रेसची मंत्रीमंडळे मोठया बहुमताने निवडून आली. परंतु ती फक्त भांडवलदारांचे हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी कार्य करु लागली. दरम्यान कॉंग्रेसमध्ये असणा-या डाव्या व उजव्या गटामध्ये संघर्ष होवू लागला. त्यामुळे दुस-या महायुध्दात ब्रिटीशाना पाठींबा द्यावयाचा की नाही याबद्दल स्पष्ट निर्णय होवू शकला नाही. १९४० मध्ये कॉंग्रेसने कोणत्याही समाज चळवळीचे नेतृत्व केले नाही. उलट समाज चळवळ कमकुवत कशी होईल यासाठी प्रयत्न केले.(२७)

साम्राज्यवाद्याच्या धोरणामुळे भारतात शेतक-यांचे दारिद्र्य वाढण्यास मदत झाली. गव्हाचे उत्पादन ५.४५ कोटी टनावरुन ४.५७ कोटी टनावर १९४१-४२ मध्ये आले. त्याच दरम्यान कर्जाचा फार मोठा बोजा शेतक-यावर पडला. १९३१ मध्ये शेतक-यावरील कर्जाचा बोजा ९०० कोटीवरुन १९३७ मध्ये १८०० कोटीवर म्हणजे दुपटीवर गेला. त्यामुळे शेतमजूरांच्या संख्येत लक्षणिय वाढ झाली. परंतु त्या मानाने

उत्पादनात वाढ झाली नाही. त्यामुळे भारतात शेतकरी वर्ग अत्यंत दारिद्रयात बुडाला.(२८)

शेतकरी वर्गाप्रमाणेच कामगार वर्ग हा दुसऱ्या महायुध्दामुळे सफर झाला. दुसऱ्या महायुध्दानंतर कामगारांच्या संख्येत लक्षणिय वाढ झाली. त्यांचे दैनंदिन जीवन खालच्या पातळीवर आले. १९४७ पर्यन्त कामगार आणि शेतकरी यांच्या दारिद्रयात वाढ झाली. परंतु भांडवलदारांच्या संपत्तीत व नफ्यात मात्र वाढ झाली.(२९)

आपल्या आर्थिक मागण्या मंजूर करुन घेण्यासाठी शेतमजूर, कामगार व मध्यमवर्गीयांनी व इतर वर्गांनी मोठा संप पुकारला. कामगारांच्या दबावामुळे भारतीय भांडवलदार ब्रिटीश साम्राज्यशाहीचे हात बळकट करण्यास मदत करु लागले. १५ ऑगष्ट १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाले. भारत दोन विभागात विभागाला गेला. दोन्ही देशातील आर्थिक स्थिती फार बिकट होती. तागाच्या गिरण्या भारतात होत्या तर ताग पिकविणारा प्रदेश पाकिस्तानात होता. त्यामुळे दोन्ही देशात त्यावरुन मतभेद व भांडणे होवू लागली. ब्रिटीश राज्यकर्त्यांनी या परिस्थितीचा फायदा उठविला. नेहरुंनी आपले धोरण अमेरिका, ब्रिटीश साम्राज्यवाद्यांच्या इच्छेनुसार चालविले. एवढेच नव्हे तर त्यांनी अमेरिकन भांडवलदारांना भारतात भांडवल गुंतविण्यासाठी सवलती दिल्या. नफ्याबद्दल खात्री, भांडवलाची सुरक्षा, नफ्याचे डॉलरमध्ये रुपांतर आणि अमेरिकेच्या उद्योगधंद्याचे राष्ट्रीयकरण केले जाणार नाही अशी भूमिका सरकारने घेतली. (३०)

नेहरु सरकारने वरील धोरण स्विकारीत असतांना सामान्य माणसाचा विचार केला नाही. त्यामुळे आर्थिक प्रश्न दिवसेंदिवस भयंकर होत चालले. कामगाराची, शेतमजूराची गरिब आणि मध्यम

वर्गीयांची, शेतक-यांची आणि कामगाराची परिस्थिती शहरामध्ये बिकट झाली. सामान्य माणसाचे जीवनमान खाली आले. जून १९४७ मध्ये निर्देशांक हा २९४.२ वरून जून १९४८ मध्ये ३८२.२ वर गेला. १९४७ मध्ये बेकारीचे प्रमाण ५.७ लाखावरून ८.७१ लाखावर १९४८मध्ये गेले. मुंबईमध्ये १0 कापड गिरण्या बंद झाल्या.(३१)

बेकारी वाढल्यामुळे उत्पादनात घट झाली. परंतु भांडवलदारांच्या नफ्यात वाढ झाली. शेतक-याची स्थिती फार बिकट झाली. धान्याचे भाव मात्र कमी झाले. त्यामुळे शेतक-याचे दारिद्र्य सतत वाढत गेले.(३२) भारतीय शेतकरी कामगार पक्षाने विचार केला की, लोक हे आर्थिकदृष्टया त्रासलेले आहेत आणि नेहरू सरकार हे भांडवलशाहीला पूरक असे धोरण अवलंबित आहे. भांडवलदाराचे हित सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न करीत आहे, त्यासाठी कराचा बोजा सामान्य जनतेवर टाकीत अहोते.

१९30 साली जनतेच्या असंतोषाला साम्राज्यशाही विरोधी लढ्याचे स्वरूप दिले गेले. भारतातील कम्युनिस्ट पक्षाने मात्र या लढयाला पाठींबा देणे गरजेचे होते. परंतु त्यांनी विरोध केला. १९30 मध्ये सुरु केलेली चळवळ इतक्या खोलवर पोहोचली की तीमध्ये सर्व थरातील लोक सामील झाले होते. या चळवळीचे नेतृत्व कम्युनिस्ट पक्षाच्या मध्यमवर्गीय पुढारपणाने केले नाही त्यामुळे ते भारतीय परिस्थितीपासून दूर गेले. राष्ट्रीय चळवळीचे नेतृत्व भांडवलदारी गटाने केले. स्वातंत्र्य लढयात सामील झालेल्या जनतेला वर्गीय दृष्टीकोन येवू शकला नाही त्यामुळे जनतेच्या राजकीय जाणीवेची योग्य वाढ झाली नाही.(३३) कम्युनिस्टांच्या धोरणामुळे जनतेचे नेतृत्व उजव्या प्रवृत्तींना बहाल केले गेले.

SHIVAJI UNIVERSITY
LIBRARY
KOLHAPUR

१९३७ ते १९५१ या काळात कम्युनिस्टांचे धोरण कधी पंथ प्रवृत्तीचे तर कधी सुधारणावादी संधीसाधूपणाचे होते. कम्युनिस्ट हे काँग्रेसमध्ये होते. जनतेला भांडवलदाराच्या दडपणाखालून सोडविण्याचा योग्य तो क्रांतीकारक प्रयत्न त्यांनी केला नाही. त्याच्या नेतृत्वाखालील असलेला सोलापूरचा कामगारवर्ग त्यांनी जाणूनबुजून काँग्रेसच्या बाहेर ठेवला. काँग्रेसमधील भांडवली पुढारपणाशी तडजोड करुन महाराष्ट्रात काँग्रेसच्या निवडणूकी बिनविरोध करण्याचा करार केला. दाजीबा देसाई म्हणतात " भारतातील कम्युनिस्ट पक्षाने जनतेचा विश्वास संपादन केला असता तर शेतकरी कामगार पक्षाची स्थापना करण्याची गरज राहिली नसती. आमचे कार्यकर्ते कम्युनिस्ट पक्षात गेले असते. " (३४)

१९४२ मध्ये छोडो भारत आणि करेंगे या मरेंगे या घोषणा हिंदी जनतेच्या साम्राज्यशाही विरोधी भावनेच्या प्रतिक होत्या म्हणूनच त्यांनी जनतेच्या मनाची पकड घेतली आणि जनता लढयात उतरली. लढयाचे निरनिराळे मार्ग जनतेने अवलंबीले. सामारच्या प्रतिसरकारला कम्युनिस्टानी चोर दरोडेखोर म्हटले तर आझाद सैन्याची उभारणी करणा-या सुभाषबाबूवर व इतर देशभक्तावर पंचमदली म्हणून जनतेला चीड आणणारे आरोप कम्युनिस्टानी केले. यामुळे कम्युनिस्ट वर्ग जनतेपासून व कामगारापासून बाजूला फेकला गेला. कम्युनिस्टांच्या या धोरणामुळे कामगाराचा मोठा वर्ग भांडवलदारांच्या आणि साम्राज्यवाद्यांच्या आहारी जावू लागला व कामगारात त्यांना स्थान मिळाले. शेतकरी हा भांडवलदारी पुढा-यांच्या आहारी गेला. मध्यम वर्ग कम्युनिस्ट विचारसरणी पासून दूर गेला. १९४८ ते १९५० या काळात त्या पक्षाच्या पुढारपणाने जे अक्षम्य चुकीचे धोरण आखले त्याला मार्क्सवादाच्या इतिहासात तोड नाही. मार्क्सवादावर विश्वास ठेवणारे पक्ष देशातील घडामोडीचे विश्लेषण वेगवेगळया पध्दतीने करु लागले त्यामुळे त्यांच्यात मतभिन्नता निर्माण झाली. ही

मतभिन्नता एवढया पराकोटीला गेली की, कम्युनिस्ट पक्षाने महाराष्ट्रात शेतकरी कामगार पक्षाची पालेमुळे खणून काढण्याचा प्रयत्न सुरु केला.(३५)

दाभाडी अधिवेशनाच्या सुमारास चिनमध्ये शेतक-यांची क्रांती झाली. त्यामुळे शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्यांना उत्साह वाढला. शेतक-यांची क्रांती यशस्वी होते हा विश्वास दुणावल्यामुळे दाभाडी प्रबंधावर चीनच्या क्रांतीचाही प्रभाव पडला. कम्युनिस्टाप्रमाणेच समाजवादी पक्षाला शेतकरी कामगार पक्षाने दोष दिला आहे. समाजवादी पक्ष सुरूवातीला स्वत:ला मार्क्सवादी मानत होता. परंतु त्याने कम्युनिस्ट इंटरनॅशनल व कॉमीन फॉर्मचे मार्गदर्शन मानले नाही त्यामुळे आंतरराष्ट्रीय परिस्थितीबाबतचे त्यांचे निदान चूकत आहे.जगाची दोन गटात विभागणी झाली आहे. एक गट साम्राज्यवादांचा दुसरा गट लोकशाहीवाद्यांचा . रशिया दुस-या गटात मोडतो. परंतु समाजवादी पक्ष रशियाला लाल साम्राज्यशाही समजातो. समाजवाद्यांच्या या भूमिकेमुळे तो अँग्लो-अमेरिकन साम्राज्यशाहीला मदत करतो. मार्क्सवादाचा मुलभूत वर्गीय दृष्टीकोन त्यांना मान्य नाही. त्यामुळे कामगारवर्गाबद्दलचे त्यांचे धोरणही क्रांतीला विघातक आणि कामगारवर्गात फाटाफूट पाडणारे आहे. हे पुढारीपण कामगाराचे नसून मध्यमवर्गीयांचे आहे. शेतकरी कामगार पक्षाचे मते कॉंग्रेसमधील भांडवलशाही पुढारीपण ब्रिटीश साम्राज्यशाहीशी हातमिळविणी करण्याचे प्रतिक्रांतीकारक ~~चळवळी~~ धोरण स्विकारीत असताना हिंदुस्थानच्या क्रांतीकारक चळवळीमधील महाराष्ट्रातील क्रांतीकारक विभागाची प्रक्रिया म्हणजेच शेतकरी कामगार पक्षाचा जन्म होय. (३६)

शेतकरी कामगार पक्षाने जन्मापासूनच मार्क्सवादी तत्वज्ञान स्विकारले आहे व ते लाखो श्रमजीवी जनतेपर्यन्त पोहोचविण्याचे महान कार्य

केले. कम्युनिस्टांच्या चुकीच्या राष्ट्रविरोधी आचारामुळे राष्ट्रप्रेमी जनतेच्या मनात मार्क्सवादाविषयी तटस्थता निर्माण झाली होती. ती दूर करुन मार्क्सवादाविषयी आपण आस्था निर्माण केली असा दावा शेतकरी कामगार पक्षाने दाभाडी प्रबंधामध्ये केला आहे. पक्षाच्या कार्याची दिशा काय राहील याचे मार्गदर्शन दाभाडी प्रबंधाव्दारे करण्यात आले आहे. ते करीत असताना क्रांतीचे तीन प्रमुख प्रकार सांगितले आहेत. (१) भांडवलशाहीचा विकास उच्च अवस्थेला पोहोचला आहे असे देश (उदा. अमेरिका, ब्रिटन ) (२) भांडवलशाहीचा मध्यम विकास झालेले देश ( पोलंड, पोर्तुगाल ) (३) जेथे उद्योगधंद्याची नुकतीच सुरुवात झाली आहे व कांही ठिकाणी त्याचा विकासही झाला आहे असे वसाहती व निमवसाहती देश (चीन, भारत) (३७)

लोकशाही क्रांतीसाठी शेतकरी कामगार पक्षाने पंधरा कलमी कार्यक्रम आखला आहे. त्यात प्रत्येकाला काम मिळण्याचा हक्क, खाजगी धंद्याच्या नफ्यावर नियंत्रण, नोकरशाही नष्ट करुन त्यांच्या जागी निवडल्या जाणा-या व त्यांना परत बोलावण्याचा अधिकार जनतेला राहील अशा अधिका-यांची नेमणूक करणे, सर्वांना शस्त्रे वापरण्याचा हक्क देणे व जनता लष्कराच्या निर्मितीवर भर देण्यात आला आहे. नवीन राज्यघटना तयार करणे की जी लोकांना पूर्ण स्वातंत्र्य व लोकशाही प्रदान करील आणि त्यांचे मुलभूत आर्थिक अधिकाराचे संरक्षण करील. पक्ष ब्रिटीश साम्राज्यशाहीशी असलेले सर्व संबंध तोडून पूर्ण स्वतंत्र संबंध प्रस्थापित करील. पक्ष कामगार, शेतकरी व मध्यमवर्गीचे लोकशाही सरकार स्थापन करील व जे जागतिक शांततेला मदत करणारे व अँग्लो अमेरिकन साम्राज्यशाहीला विरोध करणारे असेल. भाषेच्या आधारावर राज्याची पूनर्रचना केली जाईल व त्यांना त्यांचे स्वतःचे निर्णय घेण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असेल. जमीनदाराचे उच्चाटन केले जाईल. त्यांच्या जादा जमिनी कोणताही मोबदला न देता शेतक-याला वाटून

दिल्या जातील. शेतमजूराला वेतन असे देण्यांत येईल की, ज्यामुळे ते ते चांगले जीवन जगू शकतील. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण हे मोफत व सक्तीचे केले जाईल. स्त्रियाना समान अधिकार दिला जाईल. समान कामासाठी समान वेतन दिले जाईल इत्यादी.(३८)

भारतीय कम्युनिस्टानी व साम्यवाद्यानी जरी कांही चूका केल्या असल्या तरी त्यांना व इतर डाव्या विचारसरणीच्या लोकांना एकत्र करून त्यांची आघाडी केल्याशिवाय भारतात मार्क्सवाद व लेनिनवाद आणता येणार नाही म्हणून समान तत्वावर आधारीत विरोधकांची आघाडी करण्याचे प्रयत्न या पक्षाने नेहमीच केले आहेत. उध्दवरावानी तर नेहमीच आघाडीचे राजकारण केले आहे. हे त्यानी आपल्या सत्काराला उत्तर देताना व्यक्त केले होते. माझा सत्कारसुध्दा हा एक मी केलेल्या आघाडीच्या राजकारणाचाच एक भाग आहे असे ते म्हणाले होते.(३९)

उध्दवराव पाटील यांचा दाभाडी प्रबंध तयार करण्यात जरी वाटा नसला तरी पक्षाचे तत्वज्ञान म्हणून ते सर्वसामान्य नागरिकांच्या गळी उतरवण्याचे कार्य त्यांनी केले. दाभाडी प्रबंधात मार्क्सवादाचा स्विकार शेतकरी कामगार पक्षाने केला आहे असा स्पष्ट खुलासा आहे. तेंव्हा मार्क्सवाद भारतीय परिस्थितीत कसा लागू करता येईल यासाठी त्यांनी पक्ष कार्यकर्त्यांबरोबर फारच प्रयत्न केले. एखादे पद स्विकारण्यापेक्षा पक्षसैनिक म्हणून काम करणे त्यांना फार आवडावयाचे. चळवळीवर त्यांचा खूप विश्वास होता. एक ना एक दिवस श्रमीक जनतेला कळून चुकेल की, आपले शत्रू कोण व हितचिंतक कोण तोपर्यन्त चळवळी करीत रहावयाच्या. शेवटी सत्ता केंव्हातरी मार्क्सवाद्यांच्या हातात येईल याबद्दल त्यांना ठाम विश्वास होता. त्यासाठी कांही पिढया बरबाद होतील परंतु हे कार्य नेटाने चालविले पाहिजे असे त्यांचे मत होते.(४०)

## ३.३ शेतकरी कामगार पक्षाच्या मराठवाड्यातील वाटचालीमध्ये उध्दवराव यांचा वाटा :

*Why repetition?*

१९४२ मध्ये काँग्रेसने चले जावची घोषणा केली. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतात शेतक-यांचे व कष्टक-यांचे राज्य काँग्रेस स्थापन करील असे महात्मा गांधीनी जाहीर केले होते. काँग्रेसचे नेतृत्व देव गटाचे हाती होते. ब्राम्हणेत्तर चळवळीतून आलेल्या बहुजन समाजाच्या नेत्यांना काँग्रेस ही स्वातंत्र्य मिळाल्यानंतर शेतक-यांचे व कामगारांचे राज्य स्थापन करील असे वाटेना म्हणून त्यांनी भाऊसाहेब राऊत यांचे घरी काँग्रेस अंतर्गत शेतकरी संघ स्थापन करण्याचा निर्णय घेतला. ११ सप्टेंबर १९४६ रोजी केलेल्या ठरावात " काँग्रेस अंतर्गत राहून काँग्रेसचा राजकीय, आर्थिक व सामाजिक कार्यक्रम बहुजन समाजाच्यादृष्टीने व विशेषत: कामकरी राज्य स्थापन करण्याच्या काँग्रेसच्या घोषणेस शक्य तितक्या लवकर मुर्त स्वरूप देण्यासाठी संघटीत शक्ती निर्माण करणे जरूर असल्यामुळे या संघाची स्थापना करण्यांत येत आहे"असे म्हटले होते.(४१)

काँग्रेस पक्षात स्वतंत्र संघटना व सभासद करून घेणा-या संघटनाना १९४८ मध्ये बंदी करण्यांत आली. यावेळी शंकरराव देव हे अखिल भारतीय काँग्रेसचे चिटणीस होते. बंदी घातल्यामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा विचार करण्यासाठी भाऊसाहेब राऊत यांचे घरी बैठक झाली. शेतकरी व कामगार यांचे राज्य स्थापन करण्याच्यादृष्टीने काँग्रेसच्या बाहेर पडणे गरजेचे आहे व त्यासाठी स्वतंत्र पक्षाची निर्मिती करणे आवश्यक आहे असे समजून २६ एप्रिल १९४८ रोजी महाराष्ट्रात शेतकरी कामगार पक्षाची स्थापना करण्यांत आली.(४२)

हैद्राबाद स्टेट काँग्रेस अंतर्गत दोन गट होते. एक वल्लभभाई पटेल यांची विचारसरणी मानणारा तर दुसरा नेहरूंची विचारसरणी

मानणारा शिवाय मार्क्सवादी, लेनिनवादी विचाराची बहुजन समाजातून आलेली मंडळी ही या दोन्ही गटात सामावू शकली नाहीत. त्यांनी स्टेट कॉंग्रेस अंतर्गत शेतकरी संघ काढला होता. त्याला मान्यता देण्याचा प्रश्न निर्माण झाला होता. पोलीस कारवाईनंतर प्रतापगिरजी कोठीमध्ये झालेल्या स्टेट कॉंग्रेसच्या बैठकीत स्वामी गटाने शेतकरी संघ विसर्जीत करावा असा ठराव मांडला व तो मंजूर झाला. यावर ब-याच वाटाघाटी झाल्या परंतु उपयोग न झाल्याने आण्णासाहेब गव्हाणे, नरसिंगराव देशमुख, उध्दवराव पाटील, तुकाराम मुसळे व भाऊसाहेब देशमुख अशा पांच मंडळीने मराठवाडयात शेतकरी कामगार पक्ष स्थापन केला.[४३] उध्दवरावानी म्हटले आहे मराठवाडयातील शेतकरी कामगार पक्षाच्या बांधणीची जबाबदारी माझ्यासारख्या अनेक तरूण कार्यकर्त्यांच्या शिरावर पडली आहे. [४४]

शेतकरी कामगार पक्षाचे मराठवाडयात परभणी व उस्मानाबाद जिल्हयातील ग्रामीण भागात कार्य वाढले. १९५२ ची लोकसभा व विधानसभेची निवडणूक शेतकरी कामगार पक्षाने स्वबळावर लढवून निवडणूकीत दुस-या क्रमांकाची मते व जागा मिळविण्यात यश मिळविले. १९५२ च्या निवडणूक आयुक्तांच्या अहवालावरुन शेतकरी कामगार पक्षाने लोकसभेच्या दोन जागा, विधानसभेच्या २१ जागा लढविल्या. त्यापैकी लोकसभेची एक जागा जिंकली व मताचे प्रमाण १६.१४ होते तर विधानसभेच्या दहा जागा जिंकल्या व मताचे प्रमाणे १६.४ होते.[४५]

मराठवाडयामध्ये शेतकरी कामगार पक्षाच्या वाटचालीचा विचार केल्यास परभणी व उस्मानाबाद जिल्हा आघाडीवर होता.परभणी

जिल्हयाला आण्णासाहेब गव्हाणे यांचे नेतृत्व लाभले होते तर उस्मानाबाद जिल्हयाला उध्दवराव पाटलांचे नेतृत्व लाभले होते. मराठवाडयात शेतकरी कामगार पक्ष जिवंत ठेवण्यामध्ये उध्दवरावांचा फार मोठा वाटा होता. पक्षाचे अस्तित्व टिकून राहण्यासाठी पक्ष सतत कार्यरत राहिला पाहिजे असे त्यांचे मत होते. निवडणूकीत जरी पक्षाला अपयश आले तरी त्याला सामोरे जावून पक्षाच्या माध्यमातून श्रमजीवी जनतेचे प्रश्न सरकारपुढे मांडून ते सोडवून घेण्याचा प्रयत्न सतत केला पाहिजे. चळवळीवर त्यांचा फार मोठा विश्वास होता. चळवळी शिवाय कांही मिळत नाही. दुर्दैवाने संख्येने जास्त असलेल्या शेतक-याची संघटना अस्तित्वात नाही याची खंत त्यांना होती.(४६)

अलीकडील काळात शेतकरी कामगार पक्षाचे मराठवाडयातील वाढते प्राबल्य पाहिल्यास सहज लक्षात येते. सुरूवातीला दोन जिल्हयात असणारा हा पक्ष आता मराठवाडयाच्या पांचही जिल्हयात कार्यरत झाला आहे. यापाठीमागे उध्दवरावांचे कष्ट व प्रेरणा याच कारणीभूत होत. पक्षातील नेत्यांना अनेक आमिषे दाखवून सत्ताधारी पक्षात ओढण्याचे सारखे प्रयत्न होत होते परंतु उध्दवरावानी मात्र येथे यशवंतरावांची अजिबात मात्रा चालू दिली नाही. आण्णासाहेब गव्हाणे व उध्दवराव पाटील यांनी मराठवाडयात शेतकरी कामगार पक्षाला चांगल्या स्थितीत आणून सोडले. आजपर्यन्त झालेल्या निवडणूकांचा अहवाल लक्षात घेतल्यास याची प्रचिती येते.

प्रा. एन. डी. पाटील यांनी १९७८ मध्ये " माणूस " या साप्ताहिकास दिलेल्या मुलाखतीमध्ये म्हटले आहे, आमच्या पक्षाची ताकद मराठवाडयातील पांचही जिल्हयात आहे. (४७)

१९५२ व १९५७ साली झालेल्या विधानसभेच्या निवडणूकावरुन शेतकरी कामगार पक्षातील मातब्बर मंडळी हवालदील झाली. त्यांच्या अपेक्षापेक्षा निवडणूकाचे निकाल वेगळे लागले. या नेत्यांच्या सभाना मोठया प्रमाणात गर्दी असावयाची. कॉंग्रेसनेही या पक्षाचा धसका घेतला होता. १९५७ मध्ये या पक्षाने महाराष्ट्रात आपले स्थान चांगले मजबूत केले होते. परंतु या पक्षातील कांही मंडळी मंत्रीपदाच्या आशेने सत्ताधारी पक्षात गेली. पक्षाला मोठे खिंडार पडले. अशावेळी भाऊसाहेब राऊत, दाजिबा देसाई, प्रा. एन. डी. पाटील, उध्दवराव पाटील, आण्णासाहेब गव्हाणे, गणपतराव देशमुख इत्यादी नेत्यानी पक्ष सावरुन धरला व शेतकरी कामगार पक्ष महाराष्ट्रात जीवंत ठेवण्याचे महान कार्य केले. मराठवाडयात उध्दवरावानी नुसता पक्ष जीवंत ठेवला नाही तर तो वाढवण्यातही फार मोठा हातभार लावला यांत शंका नाही. त्यांचे एकूण राजकीय परिस्थितीबद्दल असे मत होते की, " राज्यातील प्रश्न जसे जसे बिकट होत जातील (महागाई, बेकारी) तशी तशी श्रमजीवी जनता मार्क्सवाद्यांना राज्य करण्याची संधी देईल." (४८)

मराठवाडयामध्ये शेतकरी कामगार पक्षातर्फे अनेक शेतमजूरांच्या, शेतक-यांच्या चळवळी आण्णासाहेब गव्हाणे व उध्दवराव पाटील यांनी चालविल्या म्हणूनच मराठवाडयात हा पक्ष जीवंत राहू शकला.

## ३.४ उध्दवराव पाटील यांनी शेतक-यांच्या प्रश्नांची केलेली मिमांसा :

उध्दवराव पाटील हे बहुजन समाजातून स्वकर्तृत्वाने प्रतिकूल परिस्थितीशी लढत झगडत वर (पुढे) आलेले नेते होत.त्यांच्यामध्ये

राजकारण, समाजकारण व अर्थकारण या विचारांचा आणि कृतीचा सुरेख संगम साधला गेला आहे. ते बहुजन समाजातून पुढे आलेले, ना त्यांना शैक्षणिक परंपरेचा वारसा, ना राजकीय चळवळीचा संदर्भ, अवतीभोवतीच सुखादु:खानी भरलेल समाजजीवन हेच त्यांच्या राजकीय विचाराच आणि आचाराच विद्यापिठ होत. शेतकरी, कष्टकरी समाजाला शोषण-मुक्त करण्यासाठी लागणारी अंतरिक उर्मी त्यांना लाभलेली शक्ती होती. ते स्वत: सामान्य माणसाच्या जीवनातच वाढलेले व घडलेले असल्यामुळे त्यांना तळातल्या माणसांच्या व्यथा आणि वेदना चांगल्या ठावूक आहेत. सामान्य माणसांच्या जीवनाचा खोलवर असा स्पर्श त्यांच्या वैचारिकतेला प्राप्त झालेली परिणामकारक किमया आहे. दलीत श्रमीक, शोषित जनतेची चळवळ म्हणजे त्यांचे जीवन होय.(४९)

वसंतराव नाईक सरकारने त्यांची उस्मानाबाद भू-विकास बँकेच्या संचालकपदी निवड केल्यानंतर तर उध्दवरावानी शेतक-यांच्या बाजूने अनेक महत्त्वपूर्ण गोष्टी केल्या. शेतक-यावर अनेक नैसर्गिक संकटे येत तरीही बँकेकडून वसुलीचा प्रयत्न होई. अशावेळी ते स्वत: बँकेचे संचालक असूनही त्यांनी बँक वसुलीला विरोध केला. जोपर्यंन्त शेतीमालाला परवडणारे भाव मिळत नाहीत तोपर्यंन्त बँकेची वसुली होवू शकत नाही असे माझे व माझ्या पक्षाचे मत आहे व त्यासाठी आम्ही वेळोवेळी चळवळीचा कार्यक्रम घेत असू.(५०) जोशी हे भू-विकास बँकेचे अध्यक्ष होते व त्यांनी उध्दवरावाना आपले वसुली विरोधी धोरण हे बँकेच्या हिताचेदृष्टीने बरोबर नाही असे सांगितले तेंव्हा ते म्हणाले शेतीधंद्यावर ज्या ज्या वेळी संकटे आली त्या त्यावेळी मी नेहमीच शेतक-यांच्या बरोबर राहिलो आहे. त्यांच्या ताकदीवरच मी अनेक लढाया केल्या आहेत. संचालक पदासाठी मी माझी भूमिका बदलणार नाही असे ठणकावून सांगितले.

रिझर्व्ह बँकेचे शेती विभागाचे प्रमुख श्री. दाते यांचेशी

त्यांचा एका मिटींगमध्ये वादविवाद झाला. तेंव्हा उध्दवराव म्हणाले, " बँक शेतक-याला कर्ज देते म्हणजे शेतक-यावर उपकार करीत नाही. देशाला धान्याची गरज असते म्हणून देते." बँकेच्या वसुलीबाबत बोलतानाही ते पुढे म्हणाले, " ज्या शेतीमध्ये ५० पोती ज्वारी होते तेंव्हा १०० रुपये भाव मिळाला तर ५०००/- रुपये शेतक-याला मिळतात. परंतु जेंव्हा त्याच शेतात नैसर्गिक परिस्थितीमुळे पाच पोती ज्वारी होते तेंव्हा जर तुम्ही शेतक-याला पाच पोत्याला पाच हजार रुपये भाव देण्याची व्यवस्था केली तर तो तुमच्या दारात बँकेची वसुली आणून देईल." उध्दवरावांच्या आग्रहावरुनच महाराष्ट्र शासनाने थकबाकीच्या प्रश्नावर वस्तुनिष्ठ अभ्यास करण्यासाठी श्री. दांडेकर यांचे अध्यक्षतेखाली एक चार लोकांची समिती नेमली. त्या समितीला त्यांनी मौलीक सूचना केल्या होत्या. परंतु पुढे ही समिती शेवटपर्यन्त कार्यरत राहिली नाही. त्यांचे स्पष्ट मत होते की, जोपर्यंत शास्त्रशुध्द, वस्तुनिष्ठ आधारावर सभासदांचे सर्वेक्षण झाले तरच त्यावर शेतीधंदा सुधारण्यासाठी विधायक उपाय सुचविले जावू शकतात. हा प्रयत्न न केल्यास थकबाकीचा प्रश्न हा ब्रम्हराक्षसासारखा वाढतच जाणार आहे.(५१)

शेती आणि भारतीय शेती व्यवस्था याविषयी उध्दवरावानी बरेच चिंतन केले आहे. जनतापक्षाचे सरकार सत्तेवर आल्यावर चरणसिंग यांनी शेती विषयी जो जाहीरनामा पक्षामध्ये मांडला होता त्याची त्यांनी स्तुती केली होती. भारतीय नेत्यात शेतीची यथार्थ कल्पना असणारा चरणसिंग हाच एक नेता आहे असे त्यांचे मत होते. चरणसिंगांची इतर मते त्यांना मान्य नव्हती. शेतीमालाला माफक भाव बांधून दिले पाहिजे व या भावावर शेती करणा-या शेतक-याचेच नियंत्रण असले पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. त्यांनी विधानसभेत व बाहेरही असा विचार मांडला की, सरकार जेवढया सवलती उद्योगधंद्याला

देते त्याच्यापेक्षा कितीतरी कमी सवलती शेतीधंद्याला देण्यात येतात किंवा सवलतींचा अभाव असतो. उद्योगप्रधान भांडवली व्यवस्थेला शोषणासाठी कुरण मिळावे म्हणूनच शेतीचे क्षेत्र ठेवण्यात आले आहे असे त्यांचे मत होते. हे असेच जर चालू राहिले तर या देशातील शेती ही कधीच प्रगत व लाभदायी होणार नाही असा त्यांचा ठाम विश्वास होता.(५२) हैद्राबादच्या विधानसभेत कुळकायद्यासंदर्भात चर्चा चालू असताना त्यांनी त्या प्रश्नावर अतिशय मौलीक सूचना केल्या. तो कुळकायदा श्रमीकांच्या दृष्टीने जास्त उपयुक्त करण्यासाठी खूपच प्रयत्न केले. तो कुळ कायदा महाराष्ट्रात पुरोगामी कायदा ठरला.(५३)

जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते बापूसाहेब काळदाते यांनी म्हटले आहे की, शेती हा उध्दवरावाचा आवडीचा विषय आहे. या विषयाचा त्यांचा व्यासंग व अध्ययन अनेकवेळा विद्वानाना विचार करावयास लावेल इतके गंभीर व गहरे आहे. शेतीचा विचारही केवळ उत्पादन वा विशिष्ट वर्गाच्या सधनते पुरताच न करता कोरवाहू शेतकरी व सर्वात निकृष्ट जीवन जगणारा शेतमजूर यांच्या संदर्भात ते शेतीचा विचार करतात. शेती हा भारताचा आधारभूत उद्योग आहे असे मानून त्याचा विकास झाला पाहिजे असा त्यांचा आग्रह आहे. ग्रामीण अर्थ व समाजव्यवस्थेच्या सर्वांगीण विकासामार्फतच राष्ट्रीय विकासाचा विचार केला पाहिजे ही त्यांची दृष्टी आहे. त्यांचे शेतीविषयक चिंतन मनाला आश्चर्यकारक वाटणारे व मोहून टाकणारे आहे.(५४)

उध्दवराव म्हणतात " घामावर जगणारा सामान्य माणूस जीवनात उभा रहावा हे त्यांच्या विचाराचे मुलगामी सूत्र आहे. शेतकऱ्याला आज भांडवलदारी अर्थव्यवस्थेच्या आक्रमणापासून जगविणे निकडीचे झाले आहे. पाश्चिमात्य देशात भांडवलदारी अर्थकारणामुळे शेतकरी संपला. तसेच भारतातसुध्दा होईल. तसे होता कामा नये,

भारतातील सहकार क्षेत्रानेही श्रीमंत शेतक-यांना अतिश्रीमंत केले आणि गरीब शेतक-याला जास्त गरीब केले. त्यामुळे आमच्या समाजात विकासाच्या संधीसाठी तणाव वाढत चालले आहेत. बेकारी व बेरोजगारी वाढत आहे. त्यामुळे श्रमजीवी तरूणाची एकजूट होण्याऐवजी त्यांच्यात रोजगारासाठी भांडण वाढत आहे असे त्यांचे मत होते.(५५)

शेती आणि शेतकरी हा त्यांचा आवडीचा विषय. शेती अर्थशास्त्राचा त्यांनी सखोल अभ्यास तर केलाच होता परंतु या प्रश्नाचे चिंतन केले होते. कोणत्याही व्यासपिठावरून या प्रश्नाचे ते मुक्त मनाने आत्मनिवेदन सादर करतात. शेतक-यांच्या प्रश्नाबाबत त्यांच्या मनात पोटतिडीक होती. आजचा शेतकरी दारिद्र्यात कसा गुरफटला गेला आहे, शेती मालाच्या किंमती संदर्भात तर त्यांनी रान उठविले होते. शेतमालाच्या किंमती निश्चित करून शेतक-यांना शेतमालाच्या किंमतीची हमीच केवळ देवून चालणार नाही तर शेतीमालाच्या भावावर शेतक-याचेही नियंत्रण असले पाहिजे असे त्यांचे मत होते.(५६)

१९७२ मध्ये उध्दवरावानी नाईक सरकार विरूध्द मांडलेल्या अविश्वास ठरावाच्या चर्चेच्यावेळी असे म्हटले आहे," दुष्काळी कायद्यामध्ये मुलभूत बदल करण्याची गरज आहे. महाराष्ट्र सरकारने केंद्र सरकारकडे कायद्यामध्ये बदल करण्याचा आग्रह धरावा, स्वातंत्र्यानंतर या देशामध्ये नियोजनबध्द विकास करण्याचा कार्यक्रम सुरु झालेला आहे. शेती उत्पादन वाढीचा कार्यक्रम हाती घेतला जात आहे. अशावेळी नव्या दृष्टीकोनातून दुष्काळी कायदा करावा, दुष्काळी फंडातून पैसा द्यावा, प्रत्येक गावात १०० विहिरी सुरु केल्यातर पाच हजार लोकांना काम मिळेल. आजारी कारखान्याच्या मालकास ज्या सवलती सरकारकडून दिल्या जातात त्या शेती धंद्यातील लोकांना द्याव्यात असे त्यांचे मत होते.(५७)

शेती व्यवसायाशी निगडीत असलेल्या विविध समस्या आणि त्याबाबतच्या उपाययोजना यावर परखडपणे विचार मांडणारे उध्दवराव हे शेतक-यांचे हितचिंतक मानले जातील. त्यांनी विधानसभेत ,लोकसभेत व सभागृहाच्याबाहेर शेती विषयक प्रश्नाबाबत अतिशय मोलाचे विचार मांडलेले आहेत. उद्योगधंद्याच्या बाबतीत सरकार जे धोरण आखते तशाच प्रकारचे धोरण शेतीव्यवसायासाठी सरकारने स्विकारले पाहिजे अन्यथा शेतीव्यवसाय तोट्यात जाईल. शेतक-याचे आर्थिक सामर्थ्य वाढले तरच त्यांची क्रयशक्ती वाढेल. निसर्गावर अवलंबून असलेल्या शेतकरी वर्गास विविध सोयी उपलब्ध करुन दिल्यासच त्यांचा विकास घडेल. २५ एकरापेक्षाही अधिक अधिक जमीन असलेला विराईत शेतकरी दारिद्र्यात अडकून पडलेला असून त्याच्या व्यवसायाची वाताहात झाली आहे असे त्यांचे मत होते. दुष्काळामुळे त्याला मजूरच बनावे लागले आहे. इतर उद्योगधंद्याप्रमाणे विविध स्वरुपाच्या सवलती सरकारने देवून या व्यवसायाचे औद्योगिकरण केल्यास शेती व्यवसायाची प्रतिष्ठा वाढेल. शेतक-यांची क्रयशक्ती व उत्पादन-शक्ती वाढेल असे त्यांचे मत होते. (५८)

शेती व्यवसायात गुंतवलेले भांडवल निश्चित काळात परत मिळेल याची खात्री नसते. त्यामुळे दुसरा व्यवसाय चालू करण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही म्हणून शेती व्यवसायाला हमी मिळाल्यास हा व्यवसाय टिकू शकेल अन्यथा मोडकळीस निघाल्याशिवाय राहणार नाही. शेतक-याला दिली जाणारी कर्जे दिर्घ मुदतीची व बीनव्याजी असली पाहिजेत असे त्यांचे मत होते. शेतक-याची संघटना नसल्यामुळे शेतक-यांच्या प्रश्नाची शासन गंभीरपणे दखल घेत नाही. परिणामी अनेक शेतक-यांना कर्जापोटी आपल्या जमिनी विकून टाकाव्या लागतात असे त्यांचे मत होते. शासनाने शेती व्यवसायाची औद्योगिक क्षेत्राशी

सांगड घालून शेतीसाठी भांडवल पुरविणे, बाजारपेठा उपलब्धा करणे, शेतीला संपूर्ण हमी देणे व शेतक-याच्या जीवनाशी योग्य असे किफायतशीर भाव दिले पाहिजेत असे त्यांचे मत होते.(५९)

कारखान्यातील वस्तुचे भाव उत्पादकच ठरवतात मात्र शेतीमालाचे भाव स्वत: उत्पादक असलेला शेतकरी ठरवू शकत नाही. त्यांचेकडे जेंव्हा माल असतो तेंव्हा त्याला भाव नसतो व त्यांच्याकडे जेंव्हा माल नसतो तेंव्हा त्याला भाव असतो. म्हणून सरकारने शेतमालाचे भाव ठरवून देवून त्यासाठी स्वत:ची यंत्रणा निर्माण केली पाहिजे असे त्यांचे मत होते. दुष्काळावर मात करण्यासाठी सरकारने उत्पादक कामे हाती घ्यावीत त्यामुळे उपलब्धा श्रमशक्तीचा जास्तीतजास्त उपयोग करावयाचा असेल तर स्थानिक पातळीवर भूजल सर्वेक्षण मार्फत पाहणी करुन ज्या ठिकाणी पाणी आहे अशा शेतक-यांच्या शेतात विहिरी खोदाव्यात त्यामुळे लोकांना कामही मिळेल व अशा कामावर होणारा खर्च वाया न जाता तो उत्पादक भांडवल ठरु शकेल असे त्यांचे मत होते.(६0)

भारतातील शेतीप्रश्नाची, शेतकरी, शेतमजूराच्या जीवनाची त्यांची जाण विलक्षण होती. त्यामुळे ते शेतीप्रश्नावरचे मान्यताप्राप्त प्रतिनिधी होते. महाराष्ट्र विधानसभेत शेतीप्रश्न, दुष्काळ, कमाल धारणा, विधोयक इत्यादी प्रश्नावरील त्यांची भाषणे त्यांच्या खोल जाणीवेची साक्ष देण्यास समर्थ आहेत. एवढेच नव्हे तर महाराष्ट्रातील शेतीप्रश्नाची सोडवणूक करण्यास मार्गदर्शक आहेत. उध्दवराव म्हणत असत शेती व्यवसायाची दोन मूलभुत वैशिष्टये आहेत. एक देशाला पुरेसे अन्न व कच्चा माल पुरविणे व दुसरे देशातील बहुसंख्य लोकांना रोजगार मिळण्याची संधी देणे. शेती व्यवसाय परंपरागत व जून्या चाकोरीतून बाहेर पडला व उद्योग बनला तर ही दोन्ही उदिष्टये साध्य होतील. त्यासाठी सरकारने

जबाबदारी उचलली पाहिजे. शेतीव्यवसायाला आधुनिक उद्योग बनवायचा असल्यास शेती व्यवस्थेचा पाया बदलला पाहिजे व तो सारा आर्थिक भार शासनाने उचलला पाहिजे. भांडवल पुरवठा, पाणी पुरवठा, आधुनिक अवजारे, खात पुरवठा, औषधे, बी-बीयाणे पुरविण्याची संपूर्ण शासकीय यंत्रणा उभारली गेली पाहिजे. आज या सुविधा शेतक-याची कंबर मोडणा-या आहेत त्यामुळे शेती उत्पादनाचा खर्च सारखा वाढतो त्या प्रमाणात शेतक-याला मोबदला मिळत नाही. कर्ज न फेडू शकणारा शेतकरी शेतीच्या आधुनिकीकरणाची योजना राबवू शकत नाही म्हणून शेती व्यवसायाचा पाया उभारण्याची जबाबदारी शासनाने घेतली पाहिजे. उध्दवरावानी हा विचार महाराष्ट्र सर्वपक्षीय दुष्काळ परिषदेत मांडला. या विचाराला तज्ञानीही पाठींबा दिला परंतु शासन अजून हालत नाही.(६१)

एकंदरीत आपल्या सर्व राजकीय आयुष्यात त्यांनी शेती आणि शेतकरी यांच्या प्रश्नाचा सातत्याने विचार केलेला आहे. त्यांच्या पक्षानेच शेतीमालाला किफायतशीर भाव मिळावा, अल्प दराने कर्ज मिळावे या मागण्या सातत्याने केल्याने शासनाला आज शेतक-याकडे पाहण्याची गरज निर्माण झाली. त्यांनी जर हे प्रश्न निर्माण केले नसते तर शासनाच्या ध्यानी शेतक-यासाठी कांही करावे असे कदापिही आले नसते. उध्दवरावांच्या या प्रयत्नातच त्यांची शेतक-याकडे पाहण्याची दृष्टी लक्षात येते. अलीकडे व्यक्तीच्या जीवनाचा विमा उतरला जातो. व्यापारामध्ये विम्याची सोय आहे अन्य क्षेत्रातही नुकसान भरपाईच्या तरतूदी आहेत. परंतु रात्रंदिवस कष्ट करणा-या शेतक-याला कोणत्याच स्वरुपाची हमी, मदत किंवा सुरक्षितता उपलब्ध करुन दिलेली नाही. समाजातील आर्थिकदृष्टया कमकुवत असलेल्या सर्वच लोकांना जीवनावश्यक सेवा अत्यल्प दरात उपलब्ध करुन दिल्याशिवाय तो वर्ग समाधानाने

जीवन जगू शकणार नाही. भविष्यकाळाची गरज ओळखून ज्यांच्या मतावर आपण निवडून जातो त्यांच्या वेदनेचा विचार राज्यकर्त्यांनी व समाजातील विचारवंतानी केला नाही तर देशातील हा वर्ग क्रांती केल्याशिवाय राहणार नाही.(६२)

## ३.५ उध्दवराव पाटील आणि उस्मानाबाद जिल्हा :

उध्दवराव पाटील यांचे आजोळ माणकेश्वर हे परांडा तालुक्यातील व उस्मानाबाद जिल्हयातील गांव. जन्मानेच त्यांचा संबंध उस्मानाबाद जिल्हयाशी आला. पुढे उस्मानाबाद ही त्यांची कर्मभूमी बनली. त्यांचे वडीलांचे गांव इर्ला हे सध्या सोलापूर जिल्हयातील बार्शी तालुक्यात आहे. शिक्षणाच्या निमित्ताने त्यांचा संबंध सुरूवातीला उस्मानाबाद जिल्हयाशी आला. त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण उस्मानिया व अलीगड विद्यापीठात झाले. १९४५ साली एल.एल.बी. झाल्यानंतर त्यांनी नरसिंगराव देशमुख यांच्या हाताखाली उस्मानाबाद येथे वकीलीस सुरूवात केली. नरसिंगराव हे उस्मानाबाद जिल्हयात सावकारी विरूध्द चळवळ चालवीत होते. सहाजिकच उध्दवरावानी यात भाग घेतला(६३) पुढे त्यांचे राजकीय कार्यक्षेत्र उस्मानाबाद जिल्हा हेच बनले. त्यांच्या राजकीय कार्यक्षेत्राचा जेंव्हा आपण विचार करतो तेंव्हा जास्तीतजास्त कार्य त्यांनी उस्मानाबाद जिल्हयातच केलेले दिसून येते. अर्थात त्यांच्या राजकीय कार्यक्षेत्राला सिमेची मर्यादा घालणे बरोबर ठरणार नाही. त्यांनी उस्मानाबाद जिल्हयासाठी केलेल्या कार्यामुळे उस्मानाबाद जिल्हा आणि उध्दवराव पाटील असे समिकरण बनलेले दिसते.

शेतकरी, शेतमजूर व दलीत यांचेसाठी त्यांनी उस्मानाबाद जिल्हयात अनेक लढे व चळवळी उभ्या केल्या. सर्वसामान्याचे प्रतिनिधीत्व

योग्यप्रकारे करता यावे व त्यांचा आवाज सरकारपर्यन्त पोहोचला पाहिजे यासाठी ते तीनवेळा आमदार व दोनवेळा खासदार म्हणून उस्मानाबाद जिल्ह्यातून निवडून आले. उस्मानाबादच्या जनतेने त्यांना जनसेवा करण्याची संधी या निमित्ताने निर्माण करुन दिली होती. या संधीचा त्यांनी पुरेपूर फायदा उठविला. प्रादेशिक विकासाच्या असमतोलाचा परिणाम उस्मानाबाद जिल्ह्यावर होत आहे याचे त्यांनी आग्रहाने प्रतिपादन केले. पूर्वी जिल्हा उस्मानाबाद असे परंतु सरकारची मुख्य कार्यालये लातूरला असत. त्यामुळे उस्मानाबाद जिल्हा हा नावापुरताच होता. उस्मानाबादवर होणाऱ्या अन्यायास वाचा फोडण्याचे कार्य त्यांनी केले. उस्मानाबादला एस. टी. डिव्हीजन व्हावे यासाठी त्यांनी सर्व विरोधी पक्षातर्फे कलेक्टर कचेरीवर मोर्चा काढला. त्याचा परिणाम सरकारला या मोर्चावर लाठी हल्ला करावा लागला. त्यांच्या प्रयत्नामुळे शेवटी उस्मानाबादला सरकारने एस. टी,चे डिव्हिजन मंजूर केले.(६४)

शेतकऱ्यांचे व शेतमजूराचे प्रश्न विधानसभेत व विधानसभे बाहेर मांडण्याचे त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. उस्मानाबाद जिल्ह्याचे ते खंदे विरोधी पक्षनेते समजले जात होते. शेतकरी व शेतमजूर यांची आंदोलने उभी करीत असताना त्यांना अनेकवेळा मोर्चे काढावे लागले. प्रसंगी लाठ्या काठ्यांचा मार सहन करावा लागला. उस्मानाबाद जिल्ह्यात शेतकरी पक्षाचे स्थान बळकट करण्यामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा होता. उस्मानाबाद जिल्ह्यातील सर्वसामान्य लोकांना उध्दवराव हे आपलेच आहेत अशी भावना त्यांनी आपल्या वागणूकीने निर्माण केली होती.(६५) सत्ताधारी पक्षाला बरेच दिवस त्यांचे विरूध्द उस्मानाबाद मतदार संघातून आपला उमेदवार निवडून आणता आला नाही यातच उध्दवरावाच्या उस्मानाबाद जिल्ह्याशी असलेल्या नात्याची प्रचिती येते.

१९७२ ला महाराष्ट्रात दुष्काळ पडला. शेतकरी व शेतमजूर फार अडचणीत आला. महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेची परिस्थिती अत्यंत बिकट झाली. चाऱ्याचा प्रश्न, रोजगाराचा प्रश्न, अन्नधान्याचा प्रश्न, पाण्याचा प्रश्न असे अनेक प्रश्न जनतेसमोर तोंड वासून उभे राहिले. या प्रश्नावर मात करण्यासाठी शेतकरी कामगार पक्षातर्फे रोजगार हमीची मागणी करण्यात आली. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी सरकारकडे आग्रह धरला. लोकांना काम मिळावे यासाठी शेतकरी कामगार पक्षातर्फे राज्यात निरनिराळे ठिकाणी मोर्चे आयोजित करण्यात आले. इस्लामपूर व वैराग येथे शेतकरी व शेतमजूर यांचे मार्फत काढलेल्या मोर्चावर सरकारकडून गोळीबार करण्यात आला. उध्दवराव पाटलाच्या नेतृत्वाखाली उस्मानाबाद येथे पंधरा हजार शेतकऱ्यांचा मोर्चा काम द्या या मागणीसाठी काढण्यात आला. मोर्चावर अश्रुधूर, लाठी हल्ला करण्यात आला. परंतु उध्दवरावांच्या या प्रयत्नामुळेच उस्मानाबाद येथे सरकारतर्फे कामे सुरु करण्यात आली. (६६)

उस्मानाबादच्या विकासासाठी त्यांनी सतत विधानसभेत आवाज उठविला. उस्मानाबादचा विकास न होण्यामागचे कारण म्हणजे उध्दवराव पाटील असे सत्ताधारी पक्षातर्फे सांगण्यात येत असे. त्यास त्यांनी असे उत्तर दिले की, " निलंग्यामधून सतत शिवाजीराव पाटील विधानसभेवर निवडून गेले, अनेकवेळा मंत्री झाले, निलंग्याचा विकास किती झाला पहा." एखाद्या भागाचा विकास होण्यासाठी त्याच भागातील भांडवलदार तयार झाले पाहिजेत. ते तयार होण्यासाठी सरकारने प्रयत्न केले पाहिजेत असे त्यांचे प्रांजळ मत होते. (६७)

---

# प्रकरण ३ रे

## संदर्भ सूची


३.१ शेतकरी कामगार पक्षाचा उदय :

१) मोरे शंकरराव – भारतीय शेतकरी कामगार पक्ष आढावा व आराखडा प्रकाशक – बाळासाहेब देसाई पृष्ठ २

२) साळुंखे एम. बी. – दे. भ. तुळशीदास जाधव गौरव ग्रंथ पृष्ठ ८०

३) मोरे शंकरराव – उपरिनिर्दिष्ट पृष्ठ ६

४) फडके य. दी. –"केशवराव जेधे " श्री विद्या प्रकाशन पुणे पृष्ठ २२१.

५) फडणीस जगन – शेतकरी कामगार पक्षाचे राजकारण अजय मुद्रणालय, कोल्हापूर पृष्ठ ३५

६) उक्त पृष्ठ १००

७) फडके य. दी. – उपरिनिर्दिष्ट पृष्ठ २३०

८) भार्गे लाड जी. डी. – पेटलेले पारतंत्र्य व धुमसते स्वातंत्र्य भारती प्रकाशन पुणे पृष्ठ २००

९) फडणीस जगन – उपरिनिर्दिष्ट पृष्ठ ३५

१०) माजगावकर श्री. ग. –"साप्ताहिक माणूस" ४ फेब्रुवारी १९७८ पृष्ठ १७

११) फडणीस जगन – उपरिनिर्दिष्ट पृष्ठ १०२

१२) उक्त पृष्ठ १०१

१३) यशवंतराव चव्हाण यांचे ध्वनीमुद्रीत भाषणाचे आधारे


BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

३.२ शेतकरी कामगार पक्षाचे तत्वज्ञान - मुख्य संदर्भ दाभाडी प्रबंध :


१४) फडके य. दी. - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ १७७

१५) उक्त पृष्ठ १८२

१६) उक्त पृष्ठ १८५

१७) मोरे शंकरराव - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ ७६

१८) फडके य. दी. - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ १८५

१९) उक्त पृष्ठ २००

२०) उक्त पृष्ठ २०१

२१) फडणीस जगन - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ ४२

२२) देसाई दाजिबा - शेतकरी कामगार पक्ष - दाभाडी राजकीय प्रबंध देसाई प्रिंटींग प्रेस अलिबाग १९६९ पृष्ठ ५

२३) उक्त पृष्ठ १३-१४

२४) उक्त पृष्ठ ११

२५) उक्त पृष्ठ १२

२६) उक्त पृष्ठ १४

२७) उक्त पृष्ठ १६

२८) उक्त पृष्ठ १७

२९) उक्त पृष्ठ १९

३०) उक्त पृष्ठ २२-२५

३१) उक्त पृष्ठ २६-२७

३२) उक्त पृष्ठ २८

३३) फडणीस जगन – उपरिनिर्दिष्ट पृष्ठ ३८

३४) उक्त पृष्ठ ३९

३५) उक्त पृष्ठ ४०–४१

३६) उक्त पृष्ठ ४३

३७) उक्त पृष्ठ ४५

३८) देसाई दाजिबा – उपरिनिर्दिष्ट पृष्ठ ६९–७१

३९) उध्दवरावांच्या ध्वनीमुद्रीत भाषणाचे आधारे.

४०) प्रा. कल्याणकर बा. ह. यांनी उध्दवरावांची घेतलेल्या मुलाखती आधारे.

Where this interview has been published?

## ३.३ शेतकरी कामगार पक्षाच्या मराठवाडयातील वाटचालीमध्ये उध्दवराव यांचा वाटा :

४१) फडणीस जगन – उपरिनिर्दिष्ट पृष्ठ २१

४२) उक्त पृष्ठ २७–२८

४३) गव्हाणे आण्णासाहेब यांच्या मुलाखती आधारे

४४) प्रा. कल्याणकर बा. ह. – संघर्ष – प्रकाशक खासदार बाळासाहेब पवार औरंगाबाद पृष्ठ २५–२६

What is the year?

४५) निवडणूक आयुक्तांचा अहवाल – निवडणूकी विषयी गोषवारा.

४६) श्री. खापले माणिकराव – माजी आमदार तुळजापूर यांच्या मुलाखती आधारे.

४७) माजगावकर श्री. ग. – उपरिनिर्दिष्ट पृष्ठ १

४८) तापडीया सुरेश – झुंजार सेनानी – प्रकाशक बजाज उद्योग समुह लातूर पृष्ठ ७४

### ३.४ उध्दवराव पाटील यांनी शेतक-यांच्या प्रश्नाची केलेली मिमांसा :

४९) प्रा. कल्याणकर बा. ह. – " सुर्य पंख " युगधारा प्रकाशन औरंगाबाद ३१ मार्च १९८४ पृष्ठ ९७

५०) प्रा. कल्याणकर बा. ह. – " युगकर्ता " त्रैमासिक एप्रिल–मे–जून १९८७ पृष्ठ ८

५१) उक्त पृष्ठ १०

५२) उक्त पृष्ठ ११

५३) प्रा. कल्याणकर बा. ह. – उपरिनिर्दिष्ट ( संघर्ष ) पृष्ठ ९

५४) उक्त पृष्ठ १२

५५) उक्त पृष्ठ १५

५६) तापडीया सुरेश – उपरिनिर्दिष्ट पृष्ठ ७८

५७) प्रा. भांडवलकर एस. एस. – " राजधर्म " दैनिक लातूर १२.७.८७ च्या लेखाद्वारे.

५८) प्रा. कल्याणकर बा. ह. – उपरिनिर्दिष्ट (युगकर्ता) पृष्ठ ७

५९) तापडीया सुरेश – उपरिनिर्दिष्ट पृष्ठ ८२

६०) उक्त पृष्ठ ८५

६१) उक्त पृष्ठ ९२

६२) उक्त पृष्ठ ९०

## ३.५ उध्दवराव पाटील आणि उस्मानाबाद जिल्हा :

६३) प्रा. कल्याणकर बा. ह. - उपरिनिर्दिष्ट (संघर्ष) पृष्ठ २३

६४) अॅडव्होकेट राजेंद्र देशमुख उस्मानाबाद यांचे मुलाखती आधारे

६५) तापडीया सुरेश - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ ४०

६६) श्री. खापले माणिकराव - माजी आमदार तुळजापूर यांच्या मुलाखती आधारे.

६७) श्री. देशमुख एम. डी. उस्मानाबाद यांचे मुलाखती आधारे.